सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्रमांक ०२०/२६१२४८१५
फॅक्स नंबर-०२०/२६१२५८७८.
Email- igoffice.industry-mh@gov.in
Website- www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,
२ रा मजला, पुणे-४११ ००१

जा.क्र.कारागृह उद्योग/जॉबवर्क/10547/२०२३/कक्ष-१० दिनांक २०.१०.२०२३

परिपत्रक

विषय :- कारागृह विभागांतर्गत खाजगी संस्था/उद्योजकांमार्फत जॉबवर्कच्या माध्यमातुन बंदी प्रशिक्षण व रोजगार प्रकल्प राबविण्याबाबतची कार्यपद्धती.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक पत्र क्रमांक ५७०५ दिनांक १२.०७.२०१३.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ७०६२/२०१४ दिनांक ०२.०७.२०१४.
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ७९२४/२०१४ दिनांक २४.०७.२०१४.

महाराष्ट्र कारागृह विभागामार्फत बंद्यांच्या सुधारणा व पुनर्वसन करणेकामी कारागृह उद्योगांतर्गत बंद्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण व रोजगार देण्यात येतो. प्रस्तुत प्रकरणी तुरुंग कायदा, १८९४ कलम ५९ च्या उपनियम (१२), (१४) व (१५) अन्वये बंदी रोजगार, बंदी परिश्रम व बंदी परिश्रमाकरिता मिळालेल्या रसदेचे विनियोग करणेबाबत शासनास नियमाचे अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

१. संस्थेची/व्यक्तीची नोंद केंद्र व राज्य शासनाच्या लागू असलेल्या नियमानुसार असणे आवश्यक असेल.
२. संस्थेस/उद्योजकास बंदी प्रशिक्षण व काम देण्यापुर्वी त्यांची पात्रता तपासण्यात यावी, संबंधितांची सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक कुवत, अपराधविषयक पार्श्वभूमी, इत्यादी तपासून घेण्यात यावी. याबाबत चौकशी करुन सर्व आवश्यक निकष पूर्ण झाल्याची खात्री केल्यानंतर संस्थेस/उद्योजकांस परवानगी देण्यात यावी.
३. सदर विषयी प्रकल्पाकरिता आवश्यक जागा, इमारत, पाणी, वीज व इत्यादी बाबींचा प्रत्यक्षात येणारा खर्च उद्योजकांकडून आकारण्यात यावे.
४. बंद्यांने किमान ८ तास परिश्रम केल्यास संस्थेमार्फत प्रति बंद्या करिता संस्थेकडुन प्राप्त होणाऱ्या किमान वेतन दरा पैकी बंद्यांना गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक जेएलई-१०१३/७२६/प्र.क्र.१८५/तुरुंग-१, दिनांक २० ऑगस्ट, २०१४, व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणेनुसार बंद्यांना मेहनताना अदा करेल. उर्वरित प्राप्त महसुलातुन २० टक्के रक्कम बंदी कल्याण निधीत जमा करुन उर्वरित महसुल मुख्य लेखाशिर्ष ००५६, तुरुंग ५०१, सेवा व सेवा फी (०१) सेवा व सेवा फी (०१) (०१) कैद्यांना इतरत्र कामावर पाठविल्याबद्दल मिळालेल्या रक्कमा (००५६००५१) या लेखाशिर्षामध्ये कारागृह नफा म्हणून शासन खाती जमा करण्यात येईल.
५. जॉबवर्क प्रकल्पाकरिता कारागृह विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवेकरिता वस्तू व सेवाकर व भविष्यात लागू होणारे इतर सर्व कर संस्थेकडुन वसुल करण्यात यावी.
६. जॉबवर्क प्रकल्प सुरु करण्यापूर्वी प्रादेशिक विभाग प्रमुख/कारागृह अधीक्षक यांनी संबंधित संस्थेसोबत सामंजस्य करार (MOU) करण्यात यावा. सामांजस्य करारामध्ये आवश्यक त्या बाबींचा समावेश करण्यात यावा.
७. बंद्यांच्या कार्यक्षमतेचा व औद्योगिक मानक यांचा विचार घेऊन टास्क (कार्य) ठरविण्यात यावे.
८. संस्थेने कारागृहाकडे सुरक्षा ठेव धनाकर्ष/धनादेश,बँक गॅरंटी, इत्यादी व्दारे जमा करावी. सुरक्षा ठेव रक्कम ही उद्योगाच्या किमान सहा महिन्याच्या अपेक्षित प्राप्त होणाऱ्या रकमेवर आधारीत असावी. सदरची सुरक्षा

ठेव रक्क्म करारनामा संपुष्टात आल्यानंतर संबंधीत संस्थेकडुन कोणतेही येणे बाकीनाही याची खात्री करुन परत करण्यात यावी.

९. संस्थेतर्फे बंदी मेहनताना धनादेश/ धनाकर्षाद्वारे महिना पूर्ण होताच पुढील पाच तारीख किंवा तत्पुर्वी संबंधित कारागृहाकडे जमा करण्यात यावे. अन्यथा दरमहा ८ टक्के दराने संबंधितांकडून दंड वसूल करण्यात येईल.

१०. खाजगी संस्थांनी बंद्यांना शासनाच्या कौशल्य विकास संस्थेमार्फत प्रमाणपत्र देणे बाबत प्रयत्नशील रहावे/प्राधन्य द्यावे. तसेच बंदी सुटकेनंतर रोजगार उपलब्ध करणेबाबत प्राधान्य द्यावे.

११. उत्पादनासाठी आवश्यक यंत्रसामुग्री संस्थेमार्फत उपलब्ध केल्या जातील. त्या मशिनरींची देखभाल, दुरुस्ती इत्यादी सर्व बाबींची जबाबदारी संस्थेची राहील. आवश्यकतेनुसार तंत्र, तंत्रज्ञ इत्यादी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१२. बंदी प्रशिक्षण व उद्योगाकरीता आवश्यक साधनसामुग्री कारागृह विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत असल्यास त्याबाबत मोबदला खाजगी उद्योजकांकडून घेण्यात यावा.

१३. संस्थेव्दारे बंद्यांचा अपघाती विमा/वैद्यकीय विमा काढण्यात यावा व सुरक्षिततेबाबतची (Safety) तसेच वातावरण प्रदूषण नियंत्रण व निवारणाची जबाबदारी खाजगी संस्था चालकावर बंधनकारक राहिल.

१४. भविष्यात जॉबवर्कबाबत कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शासकीय वसुली उद्भवल्यास सदरची रक्कम अदा करणे खाजगी संस्थेस अनिवार्य असेल. (उदा. स्वामित्वधिकार, थकीत रक्कम, इत्यादी.)

१५. जॉबवर्क मार्फत घेण्यात येणारे उत्पादने शासकीय व निमशासकीय संस्थांना थेट विक्रीकरता येणार नाही, तथापी सदरच्या वस्तुंची विक्री करिताना स्पर्धात्मक सहभाग नोंदवावा.

१६. जॉबवर्कच्या उत्पादनावर कारागृह निर्मीत वस्तु असे जाहीरात करता येणार नाही.

१७. सदर संस्था/उद्योजक यांचे सोबत सामंजस्य करार (MEMORANDUM OF UNDERSTANDING) करताना किमान तीन (३) वर्ष कालावधीचा करण्यात यावा. तसेच सदर करार रद्द करावयाचा असल्यास तीन (३) महिने अगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल. या बाबत अपर पोलीस महासंचालक यांचे आदेश अंतिम रहातील.

१८. सामंजस्य करारास मुदतवाढ दयावयाची असल्यास समाधानकारक रित्या कामगीरी चा विचार करुन शासनास अधिक उत्पन्न मिळणार असेल तर आवश्यकते नुसार सुधारीत अटी व शर्तीचा समावेश करुन करार करण्यात यावा.

१९. जॉबवर्क प्रकल्पाअंतर्गत निर्मीत होणारा कचरा, टाकाऊ उत्सर्जीत पदार्थ व इतर टाकाऊ वस्तु यांची विल्हेवाट जॉबवर्क मध्ये सहभागी होणाऱ्या संस्थेने नियमितपणे करावे.

२०. प्रकल्पांना मंजुरी देणे बाबत प्रादेशिक विभाग प्रमुख यांना प्राधिकृत करण्यात येत असुन मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यास अडचणी असल्यास मुख्यालयाचे मंजूरी घेण्यात यावी.

(अमिताभ गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

प्रति,

अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा/खुले (सर्व)/विशेष कारागृह/खुली वसाहत

**प्रत:- माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी**

१. प्रादेशिक विभाग प्रमुख (सर्व)
२. कक्ष अधिकारी (सर्व), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१